# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. शाकेरा इनामदार
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२ ७० ७० ६१


संदर्भ : रासेयो /६६६/१३

दि.२३/०३/२०१३

**प्रती,**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
राष्ट्रीय सेवा योजना संलग्नीत महाविद्यालये
पुणे शहर, पुणे

**विषय : स्वयंसिध्दा अभियान अंतर्गत युवतींना स्वसंरक्षण प्रशिक्षण देणे बाबत...**

**महोदय,**

पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना, पुणे, पुणे शहर पोलीस आयुक्तालय व स्वयंसिध्दा असोसिएशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबीर पूर्व निवड चाचणी शिबीराचे आयोजन दि. २८/०३/२०१३ रोजी स. ८.०० वा. राष्ट्रीय सेवा योजना कार्यालय, पुणे विद्यापीठ, पुणे ७ येथे करण्यात आले आहे. पुणे शहरातील प्रत्येक महाविद्यालयातील २ विद्यार्थिनींना प्रशिक्षण देवून त्यांच्या मार्फत इतर विद्यार्थीनींना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर विद्यार्थिंना त्यांच्या बायोडाटा, प्रमाणपत्र व पासपोर्ट साईज २ फोटोसह पाठवावे.

सदर निवड चाचणी शिबीरातून निवड झालेल्या विद्यार्थिनींकरीता महाविद्यालयीन परीक्षा संपल्यानंतर एप्रिल/मे १० दिवसीय मास्टर ट्रेनींग शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. त्या शिबीराकरीता निवड झालेल्या विद्यार्थिनींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

पुढील शिबीराची तारीख आपणास व विद्यार्थीनींना एसएमएस द्वारे कळविण्यात येईल. तरी या पूर्व निवडचाचणी शिबीराकरीता आपल्या महाविद्यालयातील पाच विद्यार्थिंनी वरील प्रमाणे पाठविण्यात यावे, ही विनंती,

***(कार्यक्रम अधिकारी यांनी आपल्या महाविद्यालयातील क्रिडा संचालक/क्रिडा प्रशिक्षक यांचे मार्गदर्शन घेवून पात्र निकषांची खात्री करून खाली दिलेल्या पात्रतेच्या युवती निवडाव्यात. शेवटच्या वर्षातील मुली नसाव्यात)***

***सोबत विद्यार्थिंनी नियमावली जोडली आहे.***

कळावे,

**आपली विश्वासू,**

**कार्यक्रम समन्वयक,**
**राष्ट्रीय सेवा योजना**

Pc2/Tin Job/Daily Lette134

**खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.**

| | |
|---|---|
| १. वय | – १८–२५ वर्षे |
| २. उंची | – ५.५ फूट (१५२ से.मी. पेक्षा जास्त) |
| ३. लिंग | – विद्यार्थिंनी व महिला प्राध्यापकांसाठी |
| ४. आरोग्य | – शारिरीक दृष्ट्या सक्षम |
| ५. स्वंयसिध्दा | – स्वयंसिध्दा कोर्स धारक – महाराष्ट्र शासन आयोजित |
| ६. एन.सी.सी. | – एन.सी.सी. कॅडेट असल्यास प्राधान्य |
| ७. मार्शल आर्ट प्राविण्य | – ब्लॅक बेल्ट धारक – महाराष्ट्र शासन मान्य खेळात |
| ८. मार्शल आर्ट खेळ प्राविण्य | – राज्यस्तर प्राविण्य, महाराष्ट्र शासन आयोजित |
| ९. इतर खेळ प्राविण्य | – राष्ट्रीय खेळ पदक विजेती |
| १०. प्रशिक्षण अनुभव | – कमीत कमी २ वर्षाचा स्वसंरक्षण प्रशिक्षण अनुभवी महिला |

***(टिप – १ ते ४ आवश्यक पात्रता बाबी, ५ ते १० कुठलाही एक ग्राह्य धरला जाईल.)***

**प्रशिक्षण दिनांक : २८/०३/२०१३**
**प्रशिक्षण वेळ : सकाळी ८.०० वा.**
**प्रशिक्षण स्थळ : राष्ट्रीय सेवा योजना कार्यालय, पुणे विद्यापीठ, पुणे**